Dy. Commissioner of Police, Zone-6, Chembur,
Mumbai -71
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६,
चेंबूर (पूर्व), मुंबई- ७१
Email Id - dcpzone6-mum@mahapolice.gov.in
Date 29 /10/2021

---

## प्रेस नोट - ११

**चेंबुर पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगारी टोळी प्रमुख मनिष उर्फ गोटया रघुनाथ कोंढाळकर व टोळी तडीपार**

चेंबूर परिसरात गंभीर गुन्हे करणारा टोळीप्रमुख मनिष उर्फ गोटया रघुनाथ कोंडाळकर व त्याचे टोळी विरुद्ध चेंबुर पोलीस ठाण्यात एकुण १२ गुन्हे दाखल आहेत. टोळीप्रमुख मनिष उर्फ गोटया रघुनाथ कोंडाळकर व त्याचे टोळीतील सदस्य विनोद शिवाजी गांधले उर्फे भावेश उर्फे कावा, अमन महेंद्र कांबळे यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असता देखील सदर प्रकारचे अपराधी कृत्ये सदरची टोळी वारंवार करीत असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चेंबुर पोलीस ठाणे यांनी सदर टोळीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव परिमंडळ ०६ कार्यालयास सादर करण्यात आला असता, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०६ यांनी सदर प्रकरणी नमूद सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख व टोळीच्या नमुद २ सदस्यांना मुंबई उपनगर जिल्हयाच्या हद्दीतुन १२ महीन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

सदर हद्दपार इसमांनी मुंबई उपनगर परिसरात विनापरवानगी प्रवेश केल्यास त्यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच सदरील हद्दपार इसम नमूद हद्दीत दिसुन आल्यास संबंधितांनी त्याबाबत पोलीसांना माहिती देण्यात यावी.

सन २०२१ मध्ये आज पर्यंत परिमंडळ ०६ अंतर्गत महाराष्ट्र पोलीस कायद्ा कलम ५५ अन्वये एकुण १२ टोळीच्या ४२ इसमांना तसेच ५६ व ५७ अन्वये ५३ अशा एकुण ९५ इसमांना हद्दपार करण्यात आले असुन हद्दपारी आदेश भंग करणारे एकुण ९१ आरोपीविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करून कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे. अवैध धंदे व बेकायदेशीर कृत्य करणारे तसेच सराईत गुन्हेगार यांच्या विरुद्ध भविष्यात देखील अशा प्रकारची कडक कार्यवाही करण्यात येईल.

******